## वादी तर्फे उर्वरीत उलटतपास – श्री. बी. के. देसाई वकील.

**३२.** १९९५ च्या दस्ताप्रमाणे ७/१२ ला अंमल झालेला नाही. मी प्रयत्न करुन देखील अंमल होऊ शकला नाही. मी प्रयत्न केल्याबाबतची कागदपत्रे माझ्याकडून हरवली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन करीत असल्याप्रमाणे १९९५ साली कोणताही दस्त झालेला नसून मी ७/१२ उता-याला अंमल घेण्यासाठी प्रयत्न केल्याचे व त्याबाबतची कागदपत्रे गहाळ झाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, १९९५ साली कोणताही दस्त झालेला नसून त्यावरती माझ्या सास-यांनी कोणतीही स्वाक्षरी केलेली नाही.

**३३**. प्रतिवादी क्र.२ ते ६ माझ्या नणंदा असून त्या आसपासच्या गावात दिलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे दावा मिळकती बाबत हक्कसोडपत्र करुन घेण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांचा हिस्सा डावलण्यासाठी १९९५ साली वाटपपत्र झाल्याचे खोटे सांगत आहे. मी प्रतिवादी क्र.२ ते ६ पासून मुंबईला राहत असल्यामुळे विभक्त राहत आहे. माझे व प्रतिवादी क्र.२ ते ६ चे स्वतंत्र आर्थिक व्यवहार आहेत.

**३४**. साधारणतः माझ्या सास-यांच्या मृत्यूच्या १८ वर्षांपुर्वी माझी सासू वारलेली आहे. माझी सासू वारल्यानंतर सासरे भिमा प्रतिवादी क्र.१ सोबत राहत होते. प्रतिवादी क्र.१ त्याची आई मयत होण्यापूर्वी मुंबईला नोकरी करत होता. हे म्हणणे खरे नाही की, तो त्यानंतर वडिलांसाठी नोकरी सोडून गावी आला होता. प्रतिवादी क्र.१ त्याची आई वारल्यानंतर एक वर्षाने नोकरी सोडून गावी आला होता.

**३५**. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासरे अशिक्षित असले तरी व्यवहारकुशल होते. हे म्हणणे खरे नाही की, ते गावात पंच म्हणून काम करत होते. प्रतिवादी क्र.१ चे १९९५ साली लग्न झाले आहे. तो नोकरी सोडून आल्यापासून कायमस्वरुपी गावी राहत आहे. तो शेती व्यतिरिक्त आजरा कारखान्यात नोकरी करतो. दावा मिळकती जिरायत स्वरुपाच्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सास-यांनी स्वतःसाठी व कुटुंबासाठी गावातील सोसायटी व पतसंस्थेचे कर्ज घेतले होते. मला त्यांनी काढलेल्या

कर्जाबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर रक्कम वसूल करण्यासाठी लोक घरी येत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सास-यांच्या कर्जाची परतफेड प्रतिवादी क्र.१ ने केलेली आहे.

**३६**. मला माझे सासरे व नेसरकर यांच्यामध्ये अनेक वर्षापासून जमिनीचे वाद असल्याची माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रकरणांचा माझ्या सास-यांचा खर्च प्रतिवादी क्र.१ ने केलेला आहे. मला त्यांच्यातील जमिनींच्या प्रकरणांचे पुढे काय झाले याची माहिती नाही. माझे सासरे त्यांच्या मृत्यूपर्यंत हिंडू-फिरु शकत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सास-यांच्या मृत्यूपर्यंत त्यांची संपुर्ण सेवा प्रतिवादी क्र.१ ने केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या सास-यांनी दि.१७.०१.२००६ रोजी प्रतिवादी क्र.१ च्या हक्कात मृत्यूपत्र करुन दिले आहे.

**३७**. माझ्या सास-यांनी आमच्या हक्कामध्ये मृत्यूपत्र करुन दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ च्या नावे मृत्यूपत्राने फेरफार होऊ नये यासाठी तहसिलदारांकडे आक्षेप घेतला होता. सदर मृत्यूपत्रावरुन प्रतिवादी क्र.१ चे नाव आजअखेर पर्यंत ७/१२ उता-याला दाखल आहे. मी सदर नोंदी विरोधात कोठेही अपिल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला सदर मृत्यूपत्राची माहिती होती. माझ्या पतीने १९९५ च्या वाटणी प्रमाणे नोंदी होण्यासाठी कोठेही अर्ज दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीला सास-यांनी करुन दिलेले मृत्यूपत्र मान्य असल्यामुळे त्यांनी १९९५ च्या वाटणीबाबत कोठेही अर्ज दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सर्व जमिनी प्रतिवादी क्र.१ च्या मालकीच्या असल्यामुळे आम्हाला वाटणी मागण्याचा अधिकार नाही.

**३८**. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सास-यांनी मुंबईतील खोली एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणीवपूर्वक प्रतिवादी क्र.१ चा हिस्सा डावलण्यासाठी सदर मिळकत या दाव्यात समाविष्ट केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.६३४ ची जमीन माझ्या सास-यांनी स्वतः खरेदी केलेली आहे. सदर

मिळकत माझ्या सास-यांना आजे सास-याकडून आली आहे. सदर मिळकती व्यतिरिक्त इतर मिळकती माझ्या सास-यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. माझ्या सास-यांना त्यांच्या वैयक्तिक मिळकतींची विल्हेवाट लावण्याचा कायदेशीर हक्क होता.

**३९**. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सास-यांनी त्यांच्या हयातीत तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीची नुकसान भरपाईची रक्कम घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकती माझ्या सास-यांच्या स्वकष्टार्जित मिळकती असल्यामुळे त्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा मृत्यूपत्राने दावा मिळकतींचा मालक झाल्यामुळे त्या वाटपास पात्र नाही. आज रोजी सर्व जमिनी प्रतिवादी क्र.१ कसत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १२.०३.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.